# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक 13/12/2019**

**सभा सुचना क्रं. 20**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| 1. | **महिला व बालकल्याण समिती अंतर्गत कामासाठी लेखाशिर्षकात निधी पुर्नविलोकनास मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव** :- सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन लेखासंकेतांक 722-2740-2 महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या विविध योजना या लेखाशिर्षकातुन महिला डायलेसिस उपचार लेखासंकेतांक 721-2291-2 या लेखाशिर्षकात 25,00,000/- रुपये निधी वर्ग करणेस व लेखासंकेतांक 722-2740-2 महिला व बालकल्याण कार्यक्रमाच्या विविध योजना या लेखाशिर्षकातुन एकाकी जेष्ठ निराधार महिलांच्या उपजिविकेकरता अनुदान या लेखाशिर्षकात 80,00,000/- निधी वर्ग करण्यास ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 2. | **महिला बालकल्याण समिती मार्फत मोफत बस पास योजना या लेखाशिर्षकात निधीचे पुनविलोकनास मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदरच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली असुन, विधवा महिलांच्या मुली व मुलांसाठी शैक्षणिक अर्थसहाय्य व लेखासांकेतांक 721-722-2710-3 या लेखाशिर्षकातून विद्यार्थ्यांना मोफत बस पास योजना 722-2741 या लेखाशिर्षकात 10,00,000/- रुपये निधी वर्ग करण्यास आजची ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 3. | **वसई विरार महानगरपालिका कार्यक्षेत्रातील संरचनात्मक निरिक्षणाकरीता नियुक्त करणेत आलेल्या स्थापत्य अभियंतांच्या पॅनलवर मे. रेट्रो फिटर्स कंन्सल्टींग इंजिनिअर्स तसेच श्री. निलभ धनजंय गुप्ता यांची नियुक्ती करणेबाबत.** | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात साधक/बाधक चर्चा करण्यांत आली. सद्यस्थितीत 12 अभियंते उपलब्ध असून जास्तीचे दोन इंजिनिअर्स पॅनेलवर नियुक्त करण्याची आवश्यकता नसल्याचे ठरल्याने सदरचा प्रस्ताव फेटाळण्यांत येत आहे. यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज ठाकूर सूचक :- मा.श्री. उमेश नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| 4. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभागृह व मा.आयुक्त यांच्या कॉन्फरन्स रुम करीता इंटरॲक्टीव फ्लॅट पॅनल खरेदी करणेकामी ई-निविदा प्रकियेद्वारे प्राप्त लघुत्तम दर मंजुर करुन लघुत्तम निविदाधारकाबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदरबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करणेंत आली. चर्चेत स्थायी समिती सभागृह व मा.आयुक्त यांच्या कॉन्फरन्सरूमकरीता इंटर ऍक्टीव्ह फ्लॅट पॅनलसह मा.सभागृह आवश्यक सुविधांबाबतचा अद्यावत प्रस्ताव येणे जरूरीचे होते. तरी सदरचा प्रस्ताव न आल्याने तुर्त विषयांकित प्रस्ताव ही सभा तहकुब करीत आहे. यास सभेने मंजूरी दिली. तसेच अद्यावत सुविधांबाबत प्रस्ताव पुढील स्थायी समितीत ठेवण्यांत यावा यास सभेने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज ठाकुर सूचक :- मा.श्री. हार्दिक राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 5. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प) प्रभाग क्र.36 मध्ये बोळींज येथील राम मंदिर तलावाजवळील प्रशांत जोशी यांचे घर ते गणेशोत्सव स्टेज पर्यंत पाईप गटार बांधणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.14,06,428/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 6. | **वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासीनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 16 वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी वित्तसहाय्य देणेबाबत.** | **ठराव :-** सदर प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यात आली, प्रस्तावातील नमुद खर्चाच्या तक्त्यात अ.क्र.1 मध्ये रक्कम रुपये 10,200/- नमुद आहे. तेथे 1,02,000/- ही रक्कम अपेक्षित असताना टंकलेखनाद्वारे 10,200/- ही रक्कम दर्शविली आहे. तथापी अ.क्र.1 ते अ.क्र.18 ची (संबंधीतांनी सादर केलेल्या अंदाजपत्रकातील रक्कमेप्रमाणे) बेरीज 5,11,847/- अचुक येते. सदरच्या दुरुस्तीस ही सभा मंजूरी देत येत आहे. प्रस्तावात वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 16 वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठीचे आयोजन करणेंस व संबंधीतांस वित्त सहाय्य देणेकामी मंजुरी मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला आहे. वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 16 वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेचे आयोजनकामी होणाऱ्या खर्चावर महापालिकेचे नियंत्रण राहणार असून खर्चाच्या वेगवेगळ्या बाबी महानगरपालिकेमार्फत मंजुर करुन खर्च करण्यात येणार असल्याने संबंधीतांना वित्त सहाय्य न देता खालील नमुद प्रमाणे कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.<br>त्यानुसार वसई विरार शहर महानगरपालिका व वसई विकासनी संचालित वसई दृककला महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यामाने 16 वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेचे आयोजन करण्यास व त्याकामी रुपये 4 लक्ष इतक्या खर्चास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे. 16 वी प्रत्यक्ष राज्यस्तरीय निसर्ग चित्रण स्पर्धेसाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींचे तपशिलवार व बाजारभावाशी सुसंगत असे अंदाजपत्रक तयार करुन सदर बाबवार एकत्रित अंदाजपत्रक वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांचेमार्फत महानगरपालिकेस सादर करण्यांत यावे व त्या बाबवार सादर |

| | | |
|---|---|---|
| | | केलेल्या एकत्रित अंदाजपत्रकानुसार महानगरपालिकेने वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांस करावयाच्या खर्चाची रक्कम महानगरपालिकेच्या कला-क्रीडा विभागाने आगाऊ स्वरुपात अदा करावी व अदा केलेल्या खर्चाचे विनियोग प्रमाणपत्र वसई विकासनी संचालित वसई विकासीनी दृककला महाविद्यालय यांना महानगरपालिकेत सादर करणे बंधनकारक राहील.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश चौधरी सूचक :- मा.श्री. कल्पेश मानकर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 7. | **प्रभाग समिती अ मधील विरार (प.) प्रभाग क्र.33 मध्ये बोळींज नाका ते विनय युनिक पर्यंत रस्ता डांबरीकरण व साईड पट्टीचे खडीकरण करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम (रु.49,44,677/-) या खर्चास ही सभा प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहे. व सदर कामी ई-निविदा दर मागविण्यात यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सचिन देसाई सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 8. | **अग्निशमन विभागातील 40 मीटर उंचीचे टर्न टेबल लॅडर (T.T.L.) वाहन दुरुस्ती करीता स्पेअर पार्टस खरेदी करणेस मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली. अग्निशमन विभागातील टर्न टेबल लॅडर 40 मीट उंच शिडीचे वाहन विशेष हेतूने बनविले असून विदेशातील रोझनबार इंटरनॅशनल यांचेकडुन खरेदी केले आहे. या वाहनासाठी लागणारे स्पेअरपार्ट भारतातील अधिकृत विक्रेते ऍनलॉन टेक्नॉलॉजी सोल्युशन प्रा.लि.यांचे व्यतिरिक्त कोठेही उपलब्ध होत नसल्यामुळे लागणारे स्पेअरपार्ट हे मुळ कंपनी अथवा कंपनीचे अधिकृत विक्रेते यांचेकडुन उपलब्ध करावे लागणार आहेत व त्यांनी साहित्याच्या दराबाबत प्रोफॉर्मा इनव्हाईस दिले आहे. प्रोफॉर्मा इनव्हाईस मधील दराप्रमाणे टर्न टेबल लॅडर वाहनास लागणारे साहित्य रोझनबार इंटरनॅशनल कंपनीचे भारतातील अधिकृत विक्रेते ऍनलॉन टेक्नॉलॉजी सोल्यूशन प्रा.लि.यांचेकडुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण 5(2)(2) अन्वये विना निविदा ऍनलॉन टेक्नॉलॉजी सोल्यूशन प्रा.लि.यांचेकडुन थेट खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या रक्कम रु.10,79,504/- खर्चास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देत आहे.<br><br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. अफिफ शेख**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 9. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वार्ड क्र.42 मधील गांगडेपाडा येथील पांडे निवास ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर कामी अनुषंगाने येणाऱ्या रु.33,28,269/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे. |

| | | |
|---|---|---|
| | **कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पद्माकर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 10 | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वार्ड क्र.42 पलटपाडा व जाधवपाडा ते मुख्य नाल्यापर्यत आर.सी.सी पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशास्कीय मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर कामी अनुषंगाने येणाऱ्या रु.73,30,234/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. वैभव पाटील सूचक :- मा.श्री. पंकज पद्माकर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 11. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील वार्ड क्र.42 रेहमान नगर ते मुख्य नाल्यापर्यंत आर.सी.सी. पाईप गटार करणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यना मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सदर कामी अनुषंगाने येणाऱ्या रु.7330234/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच पुढील निविदा कार्यवाहीस मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. शुभांगी गायकवाड सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 12. | **सन 2019-2020 च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामधील तरतुदीच्या पुर्नविनियोजनास मंजुरी मिळणेबाबत.** | **ठराव :-** प्रस्तावाचा मजकुर पाहता वाढीव तरतुदीची आवश्यकता असल्याने सन 2019-2020 या वित्तीय वर्षाकरिता सर्वसाधारण किमतीत रस्ते दुरुस्ती विकसीत करणे या लेखाशिर्षकातून सर्वसाधारण नियमीत विविध योजनाअंतर्गत रोड रिस्टोरेशन या लेखाशिर्षकात रक्कम रु.1000 लक्ष तरतुद वर्ग करुन सोबत जोडलेल्या नमुना नं.10 मधील लेखाशिर्षाच्या तरतुदीच्या पुर्नविनियोजनास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.सचिन देसाई सूचक :- मा.श्री. उमेश दत्तात्रेय नाईक**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 13. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्रभाग समिती एफ (जुना ड) ज्ञानदिप शाळा ते मेन रोड पर्यंत पाईप बधणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुनम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. सदर कामी मे.सी.एस.मोहिते यांची निविदा 9.23% कमी दराची ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त याचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व |

| | | |
|---|---|---|
| | | त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज पद्माकर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 14. | **प्रभाग समिती एफ धानिव/पेल्हार क्षेत्रातील प्र.क्र.05 कोपर स्वाध्याय मंदीर ते कशिद गाव पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक बाधक चर्चा करण्यात आली. सदर कामी मे.सद्गुरु कंस्ट्रक्शन यांची निविदा 12% कमी दराच्या ही प्राप्त निविदामध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73(क) अन्वये संविदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगीक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. कल्पेश मानकर सूचक :- मा.श्री. पंकज पद्माकर पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| 15. | **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या ग्रंथालय विभागामार्फत फिरते ग्रंथालय हा नाविण्यपूर्ण उपक्रम सुरु करणेकरीता वाहन खरेदी करणेबाबत.** | **ठराव :-** सदर विषयावर आजच्या मा.स्थायी समिती सभागृहात झालेल्या सभेमध्ये सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार फिरते ग्रंथालय हा नाविन्यपुर्ण उपक्रम सुरू करणे करीता नविन वाहन खरेदी करण्यापूर्वी संबंधित विषयावर सखोल माहिती गोळा करण्याचे निर्देश मा.स्थायी समिती सदस्यांकडून ग्रंथालय विभागाला देण्यात आले. वाहन खरेदीवर होणारा अंदाजित खर्च, वाहन चालकावर होणारा अंदाजित खर्च, वाहनांसाठी लागणाऱ्या इंधनावर होणारा खर्च, वाहनाच्या इंशुरन्सवर होणारा खर्च, वाहनांच्या देखभाल दुरूस्तीवर होणारा खर्च, फिरते ग्रंथालयासाठी लागणाऱ्या कर्मचारी वर्गावर होणारा खर्च, फिरते ग्रंथालयात ठेवण्यांत येणाऱ्या पुस्तकांवर होणारा अंदाजित खर्च इ. बाबींवर माहिती गोळा करून सदरची माहिती मा.स्थायी समितीच्या पुढील सभेत सादर करण्यांत यावी. तोपर्यंत सदरचा विषय स्थगित ठेवणेंत यावा असे ठरले.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. ज्योती धोंडेकर सूचक :- मा.श्री. हार्दिक राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव
वसई विरार शहर महानगरपालिका